नियमित फौजदारी खटला नं. ३९७/२०२४

निशाणी– ४६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ चा जबाब.**

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– गौरव विकास रणदिवे

वयः– २७ वर्षे, धंदाः– चालक

राहणारः– सिध्दार्थ नगर, अहिल्यानगर

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती एम. यु. कडलग यांचेकडूनः–**

१. दि. २४/०४/२०२३ रोजी मला पोलिसांनी तोफखाना पोलीस ठाणे येथे बोलाविले होते. त्यानंतर मी पोलीसांसोबत ढवणवस्ती येथे गेलो होतो व घटनास्थळ पोलिसांनी दाखविले होते. पोलिसांनी कश्याचा पंचनामा तयार केला होता हे आता मला आठवत नाही. मला आता अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अ. क्र. २ वर माझी सही असुन ती मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि. क्र.४७** देण्यात येते. माझ्यासोबत दुसरा पंच शामराव गायकवाड हा देखील हजर होता. सदर पंचनाम्यावर त्याची अ. क्र. १ वर सही असुन ती मी ओळखतो. त्याठिकाणी काय घडले होते हे मला आठवत नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. वाय. बी. नेमाने यांचेमार्फत सुरुः–**

२. आरोपी वकिल वारंवार पुकारले असता गैरहजर. आरोपी क्र. १ व ४ हजर. आरोपी क्र. १ व ४ यांना उलटतपासाची संधी दिली असता नाकारले. सबब, उलटतपास नाही.

फेर तपास नाही.

श्र. नि. स्वि.

RESHMA SHAIKH

Digitally signed by RESHMA SHAIKH
DN: cn=RESHMA SHAIKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6947454, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.31 18:17:22 +0530

( श्रीमती आर. एम. शेख )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.

दि. ३१/०७/२०२६.

अहमदनगर